Original Article
ISSN (Online): 2582-7472

ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts
May 2024 5(5), 485–490

# EXISTENCE OF THE VIDARBHI FILM INDUSTRY: AN ANALYTICAL STUDY

# "विदर्भ चित्रपट उद्योगाचा अस्तित्व: एक विश्लेषणात्मक अभ्यास"

Abhishek Khule [1]

[1] Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University, Nagpur

**DOI**
10.29121/shodhkosh.v5.i5.2024.399 9

**Funding:** This research received no specific grant from any funding agency in the public, commercial, or not-for-profit sectors.

**Copyright:** © 2024 The Author(s). This work is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.

With the license CC-BY, authors retain the copyright, allowing anyone to download, reuse, re-print, modify, distribute, and/or copy their contribution. The work must be properly attributed to its author.

OPEN ACCESS

## ABSTRACT

**English:** Nagpur - Recently, the announcement of the establishment of a film city in Vidarbha has been made. Naturally, it is a welcome development for the region and its cultural field. However, whether it will materialize or not, and what the challenges and obstacles ahead are, this research paper attempts to explore. Vidarbhi artists should not limit themselves by drawing boundaries around themselves. Following the saying "This world is my home," one should think broadly about how their artwork can reach the entire world without placing any specific "tag" on it. However, it is evident from this research that this is not happening effectively. In this study, I have referred to interviews with experts in the field and some published literature.

**Hindi:** नागपुर - हाल ही में, विदर्भ में एक फिल्म सिटी की स्थापना की घोषणा की गई है। स्वाभाविक रूप से, यह क्षेत्र और उसकी सांस्कृतिक धारा के लिए एक स्वागत योग्य विकास है। हालांकि, क्या यह वास्तव में आकार ले पाएगा या नहीं, और इसके सामने कौन-कौन सी चुनौतियाँ और बाधाएँ हैं, इस पर इस शोध पत्र में चर्चा की गई है।विदर्भ के कलाकारों को खुद को सीमाओं में बांधकर नहीं रहना चाहिए। "यह दुनिया मेरा घर है" इस कहावत का पालन करते हुए, उन्हें इस बारे में व्यापक सोचनी चाहिए कि उनकी कला पूरी दुनिया में कैसे पहुंच सकती है, बिना किसी विशेष "टैग" के। हालांकि, इस शोध से यह स्पष्ट होता है कि यह प्रभावी ढंग से नहीं हो रहा है। इस अध्ययन में, मैंने इस क्षेत्र के विशेषज्ञों से की गई मुलाकातों और कुछ प्रकाशित साहित्य का संदर्भ लिया है।

## प्रस्तावना

बर्लिन गाजवून आलेल्या ‘घात’चे नागपुरातल्या एका मल्टिप्लेक्समध्ये स्पेशल स्क्रीनिंग ठेवण्यात आले होते. दर्दी रसिकांनी गर्दी केली होती. चित्रपट संपला. दिग्दर्शकासह युनिटमधील अन्य लोकांना

प्रेक्षकांनी गराडा घातला. त्यात विदर्भातल्या एका शहरातून आलेला 'जाणकार' या प्रकारात मोडणारा एक प्रेक्षकही होता. त्याने दिग्दर्शक छत्रपाल निनावे यांना गाठले अन् काहीसा चाचरत म्हणाला, 'विदर्भातला चित्रपट म्हणून मी या शोला येणार नव्हतो. पण, काय बनवला हो सिनेमा! विदर्भातही असे सिनेमे बनू शकतात, याचा आनंद आहे.' यावर काय उत्तर द्यायचे, हे निनावेंना कळलेच नाही.

'घात' च्या बाबतीत घडलेला हा प्रसंग तसा काही नवीन नाही. कित्येक वैदर्भी निर्माते, दिग्दर्शक या अनुभवातून गेले आहेत. मात्र, त्यातून आपल्याच मातीबद्दलची अशी अनास्था निश्चितच जिव्हारी लागणारी आहे. 'आपलं' म्हणजे ते दुय्यमच असणार, अशी जी मानसिकता वैदर्भीयांनी करून ठेवली आहे, ती येथील सांस्कृतिक, मनोरंजन विश्वासाठी मारक ठरते आहे. 'अहो, आम्ही जे निर्मिलं ते एकदा बघा तरी' , ही वैदर्भी निर्माते, दिग्दर्शक, कलावंतांची आर्त आळवणी म्हणूनच संयुक्तिक वाटते. 'जब तक तालाब में उतरोगे नही, तब तक गहराई का पता कैसे चलेगा' , असे या परिस्थितीवरून इथे आवर्जून नमूद करावेसे वाटते.




नागपूर-विदर्भात चित्रनगरी स्थापन करण्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी गेल्या सप्टेंबरमध्ये केली. त्यानुसार प्रशासन कामाला लागले. नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन

इटनकर यांच्या नेतृत्वात चित्रनगरीसाठी रामटेक, मौदा आणि कळमेश्वर इथे शंभर एकर जागेचा जागेचा शोध सुरू झाला. अद्याप मनासारखी जागा मिळालेली नाही, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. नागपूर-विदर्भात चित्रनगरी स्थापन करण्याच्या घोषणा याआधीही कित्येक वर्षांपासून झाल्या. आता त्याला मूर्तरूप येईल, असे प्रशासनाच्या हालचालींवरून दिसते आहे. मात्र, प्रश्न हाच की, नागपूर-विदर्भात चित्रनगरी स्थापन झाली तर त्याचा वैदर्भीयांना कितपत फायदा होणार!

आधीच विदर्भ अनुशेषाच्या गर्तेत आहे. बऱ्याच पातळ्यांवर आता विकास पोहोचत असला तरी सांस्कृतिक, मनोरंजनदृष्ट्या आपण विंगेच्या कितीतरी पलीकडे आहोत, हे वास्तव नाकारून चालणार नाही. अशात नागपूर-विदर्भात चित्रनगरीच्या स्थापनेची घोषणा सुखावणारी आहे. चित्रनगरी म्हणजे नेमके काय होणार? तर, चित्रपटनिर्मितीसाठी लागणारे सेट, सोबतच कॅमेरे, एडिटिंग युनिट, काही तांत्रिक साहित्यांची उपलब्धता असे सारे सारे अपेक्षित आहे. म्हणजे, भविष्यात प्रशासनाला योग्य ती जागा शोधण्यात यश आले, सरकारकडून सर्व बाबींची वेळोवेळी पूर्तता झाली तर नागपूर-विदर्भात कलावंतांचा राबता, 'ॲक्शन' च्या ऑर्डरचे आवाज, चित्रीकरणाची गंमत असे सर्व काही अनुभवता येईल. मात्र, येथील काही निर्माते, दिग्दर्शक एक प्रश्न आवर्जून उपस्थित करतात, तो म्हणजे, हे सगळे सांभाळणारा स्थानिक प्रशिक्षित मनुष्यबळ येथे उपलब्ध असेल का? हा प्रश्न खरेच विचार करायला लावण्याजोगा आहे.

मुंबई-पुण्याकडे सिनेमा, त्याच्या तांत्रिक बाबींचे वातावरण आधीपासून आहे. 'वहाँ के हवा में ही सिनेमा हैं' , असे म्हणतात ते उगाच नाही. त्यामुळे तेथील तरुण त्या वातावरणाशी समरस असतात. नागपूर-विदर्भात गुणवत्ता भरपूर आहे. मात्र, प्रशिक्षणाचा पाया भक्कम आहेच, असे नाही. 'सेटवर कसं वावरावं, हेही इथल्या काही लोकांना सांगावं लागतं' , असे एका दिग्दर्शकाचे वक्तव्य अंतर्मुख करणारे आहे. त्यामुळे निश्चितच काही मर्यादा पडतील. अशास्थितीत नागपूर-विदर्भात तयार होऊ घातलेल्या चित्रनगरीत बाहेरचे मनुष्यबळ येऊ शकते. त्यातून पुन्हा मग वैदर्भीयांवर अन्यायाची भावना निर्माण होऊ शकते. तेव्हा आधी इथले वातावरण त्यादृष्टीने पोषक करणे ही शासन, प्रशासनाचीच नव्हे, तर इथल्या कलाक्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकाची जबाबदारी आहे.

यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, आजकाल वास्तववादी चित्रपट अधिक निर्मित होत आहेत. अशावेळी लोकेशन्सही वास्तववादी असावेत, असे निर्माते-दिग्दर्शकांना वाटत असते. गेल्या दहा

वर्षांपासूनचे चित्रपट पाहिले, तर ही बाब प्रामुख्याने निदर्शनास येते. कोल्हापुरातील चित्रतपस्वी भालजी पेंढारकरांचा जयप्रभा स्टुडिओ तसेच काही अन्य स्टुडिओ कालांतराने इतिहासजमा झाले. अशावेळी शासनाने तिथे चित्रनगरी स्थापन केली. काहीच वर्षांत तिथे जंगल निर्माण झाले. मात्र, तेथील काही स्थानिकांनी लढा दिल्यानंतर चित्रनगरी पुन्हा तयार झाली. आता तिथे चित्रपटांचे नगण्य, मात्र टीव्ही मालिकांचे चित्रीकरण होते. कारण तेच, आजकाल निर्माते-दिग्दर्शकांचा वास्तविक लोकेशनचा आग्रह. कोल्हापूरच काय, मुंबईतील स्टुडिओजचीही परिस्थिती काहीशी अशीच आहे. बहुतांश टीव्ही मालिकांचे सेट तिथे लागतात आणि त्यांचे चित्रीकरण होते. अशावेळी चित्रनगरी स्थापन करण्याचा पारंपरिक विचार केल्यापेक्षा आपण नवे काय देऊ शकतो, या चित्रनगरीत चित्रपटनिर्मितीची संख्या कशी वाढू शकेल, याचाही विचार करण्याची गरज आहे. त्याची अंमलबजावणी नागपुरातून व्हायला हवी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नागपूर-विदर्भातील चित्रपटांना यात प्राधान्य, सवलत दिली पाहिजे. जेणेकरून वैदर्भी चित्रपटनिर्मितीला बळ मिळू शकेल.

विदर्भातील काही निर्माते, दिग्दर्शकांशी याबाबत संवाद साधला असता, इथे स्थापित होऊ घातलेल्या या चित्रनगरीविषयी काहीजण आशावादी आहेत. दवाखाने, न्यायालय, पोलिस स्टेशन असे लोकेशन्स विदर्भात बरेचदा मिळत नाहीत. मग ते मुंबईचा मार्ग धरतात. तेच त्यांना येथील चित्रनगरीत मिळाले तर त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचतील. शिवाय, मुंबईच्या लोकांना विदर्भात चित्रीकरण करायचे असेल, तर त्यांना येथील चित्रनगरीत या बाबी सहज उपलब्ध होतील. ते नागपुरात चित्रीकरणाला प्राधान्य देतील, इथल्या लोकांनाही कामे मिळतील, असे काही जणांना वाटते.

तर काहींच्या मते, आधी इथे व्यावसायिक निर्मिती वाढायला हवी. वैदर्भीय सिनेनिर्माते, दिग्दर्शक, कलावंत, तंत्रज्ञांत अजूनही हवे तसे 'प्रोफेशनलिझम' निर्माण झालेले नाही, ते आधी यायला हवे. बरेचदा निर्माते स्वतःचीच गोष्ट घेऊन येतात. दिग्दर्शकाच्या कामात लुडबूड करू पाहतात. नायक म्हणून स्वतःचा मुलगा, नातेवाईक यांना पुढे करतात. अशात वैदर्भी चित्रपटसृष्टी बहरणार कशी, पुढे जाणार कशी, असाही मतप्रवाह आहे. खरेतर आधी निर्मात्यांसाठीच कार्यशाळा घ्यायला हव्यात, असेही काहींनी सुचवले.

'चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी विदर्भात अनेक लोकेशन्स आहेत. या ठिकाणांची छायाचित्रे अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या संकेतस्थळांवर आल्यास ती चित्रपट निर्मात्यांसाठी लाभदायक

ठरतील. त्यामुळे, संकेतस्थळावर या ठिकाणांची छायाचित्रे टाकण्यात यावी' , असे आवाहन महाराष्ट्र राज्य चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी अलीकडेच केले होते. 'चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शकांना आता चित्रीकरणासाठी नवी ठिकाणे हवी आहेत. त्यामुळे ते मुंबईबाहेरच्या ठिकाणांचा शोध घेत आहेत. विदर्भातील चांगली ठिकाणे चित्रपटसृष्टीपर्यंत पोहोचली पाहिजेत. चांगली ठिकाणे, कमी खर्च, सहज सुविधा उपलब्ध होणे, कलाकारांची उपलब्धता, सोपा प्रवास अशा सगळ्या गोष्टी लाभल्या तर चित्रपटांची चित्रीकरणे होऊ शकतात. अशा ठिकाणांवर चित्रीकरण करण्याकरिता लागणाऱ्या परवानग्या मिळविण्यासाठी महामंडळ मदत करू शकते' , असेही राजेभोसलेंनी नमूद केले. हीसुद्धा विदर्भाच्या विकासासाठी पूरक अशी गोष्ट आहे.

विदर्भात चित्रनगरी स्थापन व्हावी, यासाठी स्थानिक, खासगी पातळीवरही प्रयत्न झालेत. अमरावती महामार्गावर बाळासाहेब अग्रे यांनी मध्यंतरी चित्रीकरणांसाठी पूरक अशा स्टुडिओच्या उभारणीचा प्रयत्न केला होता. त्यानंतर नागपूरचे व्यावसायिक अनिलकुमार यांनी वर्धा मार्गावर सेटअप उभारला. आता लेखक-दिग्दर्शक पराग भावसार, अबू कलाम यांच्या संकल्पनेतून नागपूरच्या वाडीजवळ दहाएक एकर जागेवर खासगी चित्रनगरी स्थापन करण्यात आलीय. मात्र, या खासगी चित्रीकरण स्थळांना प्रतिसाद कसा मिळाला किंवा मिळतोय, हा संशोधनाचा विषय आहे.

मारोतराव कन्नमवार, वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक, देवेंद्र फडणवीस असे चार मुख्यमंत्री विदर्भाने महाराष्ट्राला दिलेत. प्रत्येकाने त्यांच्या त्यांच्या काळात विदर्भविकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले. मात्र, सांस्कृतिक आणि मनोरंजनदृष्ट्या विदर्भ कुठे आहे, याचे उत्तर प्रत्येकाने शोधण्याची गरज निर्माण झाली आहे. इथे प्रयत्न होत नाहीत, असे अजिबात नाही. जुन्या काळापासून अस्सल वैदर्भी चित्रपटनिर्मिती होते आहे. त्यात शंकर किणगी निर्मित १९८३ सालच्या 'माणुसकी' चा उल्लेख



प्राधान्याने करावा लागेल. त्याची कथा दिवंगत उद्धव शेळके यांची आहे. सोबत डॅडी देशमुख यांचे 'देवकीनंदन गोपाला' , 'राघू-मैना' आदी अस्सल वैदर्भी चित्रपट त्या काळात आले. नंतरही काही छोटे-मोठे चित्रपट विदर्भाच्या मातीत बनले. चित्रपटनिर्मितीच्या सर्वच क्षेत्रांवर पकड ठेवणारे नागपूरकर श्याम धर्माधिकारी यांनी मराठी सोबतच हिंदी आणि भोजपुरी भाषेतही चित्रपटनिर्मिती केली आहे.

अमर आणि अनिरुद्ध वझलवार यांच्या सारथी या प्रतिष्ठित संस्थेने नागपुरातील चित्रनगरीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. दिवंगत दिग्दर्शक संजय सुरकर यांच्यासह अभिनेते गिरीश ओक, स्मिता तळवलकर, विलास उजवणे यांचा या मागणीला पाठिंबा राहिला आहे. विदर्भ हा निसर्गसंपन्नतेने नटलेला प्रदेश आहे. म्हणूनच मुंबई-पुण्याकडच्या निर्माते, दिग्दर्शकांना या भूमीने भुरळ घातलीय. केदार शिंदे यांना 'इरादा पक्का' नागपूर-विदर्भात चित्रित करावासा वाटला. 'बदमाशियां' या मध्यंतरी येऊन गेलेल्या हिंदी चित्रपटाचं बहुतांश चित्रीकरण नागपुरात झाले. काही कारणांमुळे नागराज मंजुळे यांना 'झुंड' चे चित्रीकरण पुण्यात करता आले नव्हते. अशावेळी त्यांना आपला पूर्ण सेट नागपुरात हलवावासा वाटला. 'नाळ' ही त्यांनी विदर्भातच चित्रित केला. कित्येक हिंदी मोठ्या बॅनरच्या चित्रपटांचे निर्माते नागपुरातील आहेत. राजकुमार हिराणी, सुभाष घई, राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटाचे दिग्दर्शक संजय सूरकर आदी रत्न नागपूर-विदर्भाने देशाला दिलेत. वैदर्भी कलाकारांची, लेखकांची यादी तर मोठी आहे. चित्रा पालेकरांचा 'मातीमाय' , नीलेश जळमकरांचे 'डेबू' , 'गाभ्रीचा पाऊस' , धीरज मेश्राम यांचा 'बारोमास' , समृद्धी पोरेंचा 'डॉ. प्रकाश बाबा आमटे : द रियल हीरो' , मृणालिनी भोसलेंचा 'कापूसकोंड्याची गोष्ट' , शैलेंद्र बागडेंचा 'रेला रे' , मोरेश्वर मेश्राम निर्मित '३१ डिसेंबर' , सलीम शेख यांचे 'अघोर' , 'कौमार्य' , हरीश इथापेंचा 'तेरवं' , तृषांत इंगळेंचा 'झॉलिवूड' , शैलेंद्र नरवाडे यांचा 'जयंती' , देवेंद्र दोडके यांचा 'ते दोन दिवस' , शैलेंद्र दुपारे यांचा 'पल्याड' , संजीव कोलते यांचा 'तानी' , प्रतीक मोईत्रो यांचा '३१ मायनस' , नागराज मंजुळे यांचे 'नाळ' , 'झुंड' असे आणखी कित्येक चित्रपट विदर्भात बनलेत. त्यातील कित्येकांची निर्मिती अस्सल वैदर्भी आहे. काहींनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कारांपर्यंत मजल मारली. यातील दिग्दर्शक वैदर्भी चित्रपटसृष्टीत मोलाचे योगदान देऊ पाहताहेत. विदर्भातीलच शंतनू रोडे, तेजस

देऊस्कर, अभिजित गुरू, आशिष उबाळे आदी दिग्दर्शकांनी चित्रपटसृष्टीत उल्लेखनीय कामगिरी केलीय. स्मिता मेघे, नरेंद्र जिचकार आदींसारखे अन्य काही वैदर्भी निर्माते पुढे आले. नागपूरसह अमरावतीतही चांगले प्रयत्न झालेत. नव्या दमाचे दिग्दर्शकही येत आहेत. आपल्या मातीतले चित्रपट देण्याचा त्यांचा सातत्याने प्रयत्न असतो. प्रश्न शेवटी तोच उरतो, वैदर्भी चित्रपटांचा स्वत:चा असा ब्रॅण्ड का तयार होत नाही?

खरे तर स्वत:भोवती कुठल्याही मर्यादा, चौकटी आखून घेऊ नयेत. 'हे विश्वची माझे घर' या उक्तीप्रमाणे व्यापक विचार करावा, आपल्या कलाकृतीवर एका विशिष्ट प्रकारचा 'टॅग' न लावता ती संपूर्ण जगापर्यंत कशी पोहोचेल, याचा वैदर्भी कलावंतांनी विचार करायला हवा. मात्र, तसे प्रभावीरीत्या होत नाही, हेही दुखरे वास्तव आहे. 'आम्हाला थिएटर्स मिळत नाही. मिळालेच तर शोज मिळत नाहीत' , अशी तक्रार नेहमी ऐकू येते. 'एका विशिष्ट गटाचीच मक्तेदारी या क्षेत्रात आहे' , असाही रडवेला सूर असतो. मग या क्षेत्रात स्वत:ची मक्तेदारी निर्माण करायला वैदर्भी कलावंतांना कुणी रोखले आहे? हिंदी चित्रपटसृष्टीत एकेकाळी पंजाबची मक्तेदारी चालली. उत्तर भारतीय आपला ठसा उमटवत आहेत. भोजपुरी सिनेमांचे भक्कम अस्तित्व आहे. 'मालेगाव' चाही डंका वाजत राहतो. त्यांना हे कसे साधले, याचा 'अभ्यास' आधी गरजेचा आहे. हेवेदावे न ठेवता हातात हात घालून एकत्र येणे अत्यावश्यक आहे.

अनुशेषाच्या या विदर्भाचे हात नुसते घेते राहिलेले आहेत, असेही नाही. आपण हाडाचे रसिक आहोत, असे इतिहास सांगतो. मास्टर दीनानाथ मंगेशकरांवरचे कर्ज वैदर्भीयांनी फिटवले, ही आपली खरी ओळख आहे. मग आपण स्वत:बद्दल, स्वत:च्या भूमीबद्दल आणि स्वत:च्याच माणसांबद्दल उदासीन का राहावे? नुसते संकुचित, चौकटीत किती दिवस राहायचे? चित्रपटनिर्मिती करायची, तो कुठे तरी सिंगल स्क्रीनमध्ये लागणार, आठवडाभराचीही शाश्वती नसणार, आग्रहाने आपल्या ओळखीच्यांना, नातेवाइकांना 'आमचा चित्रपट पाहायला या' म्हणत गळ घालणार, हे कुठवर चालणार? नाणे नुसते खणखणीत असून चालत नाही, ते तेवढ्या ताकदीने वाजवताही आले पाहिजे. आत्मसाक्षात्कार व्हावा, यासाठीही एक दृढ इच्छाशक्ती असावी लागते. ती वृद्धिंगत करण्याचे काम झाले पाहिजे. 'आमच्यावर नेहमी अन्याय होतो' , असा बॅण्ड वाजवत राहिल्यापेक्षा स्वत:चा ब्रॅण्ड विकसित करण्याची हिंमत आता अंगी आणायला हवी. नुसते चाचपडत राहण्याचे दिवस बदलणे आपल्याच हाती आहे. नुसत्या

गप्पा नकोत, कृती हवी. अन्यथा कितीही चित्रनगरी विदर्भात येऊद्यात. त्यात स्वत:चे अस्तित्व निर्माण करता आले नाही, तर गुणवत्तेला काहीही अर्थ नाही. स्वत:ला 'सेट' करून आता 'अॅक्शन' म्हणण्याची हीच वेळ आहे.

**निष्कर्ष**

वैदर्भी चित्रपटसृष्टी चांगले प्रयत्न करीत आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर वैदर्भी दिग्दर्शक, कलावंत, तंत्रज्ञांनी नावही कमाविले आहे. मात्र, व्यावसायिक पातळीवर अजूनही म्हणावे तसे यश मिळालेले नाही. त्यासाठी आणखी जोरकस प्रयत्न करण्याची गरज दिसून आली. सर्व वैदर्भी कलावंत, निर्माते, दिर्दर्शक, तंत्रज्ञांनी एकत्र येत, संघटन स्थापन करीत वैदर्भी चित्रपटसृष्टीला व्यावसायिक स्तरावरही यश मिळवून देण्यात हातभार लावावा, हीसुद्धा मुख्य गरज अधोरेखित झाली.

# संदर्भ

'फिल्म क्लब' स्थापून वैदर्भीय चित्रपटांची चर्चा व्हावी

https://www.tarunbharat.net/Encyc/2024/2/5/Film-Club-established-foreign-Vidarbha-films-Tarav.html#/google_vignette

**विदर्भातील मराठी चित्रपटसृष्टी**

https://marathichitrapatshrushti.blogspot.com/2015/04/blog-post_18.html

नागपूरसाठी गुड न्यूज! १०० हेक्टरमध्ये होणार चित्रनगरी

https://pudhari.news/maharashtra/vidarbha/nagpur/nagpur-film-city-100-hectares-sudhir-mungantiwar